**प्रसिध्दी पत्रक**

**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट)ला दि. १ एप्रिल, २०२५ पासून लागू होणारा वीज दर**

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) ही मुंबई शहरात विजेचे वितरण करणारी एक परवानाधारक आहे. बेस्टची आर्थिक वर्ष २०२२-२०२३ ते २०२३-२४ करिता अचूक समायोजन (true-up), २०२४-२५ करिता तात्पुरते अचूक समायोजन (provisional truing-up), आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या ५ व्या बहु-वर्षीय वीज दर नियंत्रण कालावधीकरिता एकूण महसुली गरज (ARR) आणि वीज दरास मंजुरीसाठीची वीज दर याचिका दि.१४ जानेवारी, २०२५ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (मविनिआ किंवा आयोग) दाखल करुन घेतली.

आयोगाने या याचिकेवर जनतेकडून लेखी सूचना मागविल्या आणि दि. १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी जन सुनावणी घेतली. या प्रक्रियेनंतर आयोगाने, दि. २८ मार्च, २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे सन २०२४ च्या प्रकरण क्र. २०७ मध्ये २०२५-२६ ते २०२९-३० या ५ व्या नियंत्रण कालावधीकरिता बेस्टची एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित केला आहे. सुधारित वीज दर दिनांक **१ एप्रिल, २०२५** पासून अंमलात येतील.

आयोगाने सन २०२४ च्या प्रकरण क्र. २०७ मध्ये दिलेल्या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

१. आयोगाने, आर्थिक वर्ष २०२२-२३ ते २०२३-२४ करिता अचूक समायोजन, २०२४-२५ करिता तात्पुरते अचूक समायोजन केल्यानंतर, बेस्टने दावा केलेल्या रु. ७१.५० कोटींच्या निव्वळ शिलकी ऐवजी रु. २९७.३० कोटींची निव्वळ शिल्लक मंजूर केली आहे. आयोगाने ग्राहक हित आणि वितरण परवानाधारकाचे वैध खर्च या दोहोंमध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे.
२. आयोगाने, मागील तूट/(शिल्लक) विचारात घेऊन, आर्थिक वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या ५ व्या बहु-वर्षीय वीज दर नियंत्रण कालावधीसाठी एकूण महसुली गरजेच्या वसुलीस खाली दर्शविल्यानुसार मंजुरी दिली आहे :

| अनु. क्र. | तपशील | युनिट | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | २०२८-२९ | २०२९-३० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेस्टने अंदाजित केलेली एकूण महसुली गरज | रु. कोटी | ४,३९३.९९ | ४,५९२.५४ | ४,८५१.३५ | ५,११६.०५ | ५,४३२.७३ |
| २ | आयोगाने मान्य केलेली एकूण महसुली गरज | रु. कोटी | ४,४७३.७४ | ४,५६१.८७ | ४,८४१.५७ | ५,२९६.५० | ५,२१७.०१ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च रु. प्रति युनिट | रु. प्रति युनिट | ८.६७ | ८.३१ | ८.२७ | ८.४८ | ७.८२ |
| ४ | **वीज दरातील सरासरी वार्षिक वाढ/(घट)** | **%** | **-९.८२%** | **-४.१६%** | **-०.३९%** | **२.५२%** | **-७.८४%** |

३. वीज दरातील एकूणच कपातीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत -

(ए) टीपीसी-निर्मितीच्या औष्णिक संचाकडून किमान तांत्रिकतेवर विजेची खरेदी

(बी) आर्थिक वर्ष २०२९-३० नंतर टीपीसी-निर्मितीच्या संच ५ कडून विजेची खरेदी करणे बंद.

(सी) ५ व्या नियंत्रण कालावधी दरम्यान अल्प-कालिन नूतनशील ऊर्जेपासूनच्या वीज खरेदीतील शिल्लक राहिलेल्या विजेची खरेदी.

(डी) संबंधित याचिकांमध्ये मंजूर केल्या जाणाऱ्या एकूण महसुली गरजेच्या आधारावर पारेषण/एसएलडीसी/एसटीयु आकारांमधील कपात.

४. आयोगाने, ५ व्या नियंत्रण कालावधीसाठी स्मार्ट मीटर्स बसवणे, वितरण जाळ्यात वाढ इ. संबंधातील आरडीएसएस योजनांची अंमलबजावणी विचारात घेऊन, एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा (एटी ॲण्ड सी लॉस) मार्गदर्शिका प्रस्तावित केली आहे, ज्यामुळे बेस्टच्या ४.१८ टक्क्यांच्या सध्याच्या पातळीमध्ये आणखी घट होण्यास मदत होईल. ती खाली नमूद केल्याप्रमाणे आहे:

| तपशील | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | २०२८-२९ | २०२९-३० |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा (%)** | ४.१६% | ४.१४% | ४.१२% | ४.१०% | ४.०८% |

५. आयोगाने ओपेक्स अंतर्गत स्मार्ट मीटर योजनांच्या अंमलबजावणीस मान्यता दिली आहे, ज्यामध्ये मार्च, २०२६ पर्यंत संपूर्ण स्मार्ट मीटर योजना पूर्ण करण्याचे अपेक्षित आहे.

६. राज्यातील विद्युत वाहनांना यापुढेही प्रोत्साहन चालू ठेवण्यासाठी, आयोगाने, उच्च-दाब आणि लघु-दाब व्होल्टेज पातळीवर विद्युत वाहने (इव्ही) चार्जिंग स्टेशन्स करिता, एकल भाग (सिंगल पार्ट) वीज दरास मान्यता दिली आहे, जी ५ व्या नियंत्रण कालावधीच्या संबंधित वर्षासाठी मान्यता दिलेल्या सरासरी किरकोळ पुरवठ्याच्या खर्चाशी जोडण्यात आली आहे. प्रभावी वीज दर खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत:

| ग्राहक वर्गवारी | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | २०२८-२९ | २०२९-३० |
|---|---|---|---|---|---|
| उच्च दाब - VI विद्युत वाहने चार्जिंग (रु/kVAh)* | ८.२४ | ७.५९ | ७.६६ | ७.८८ | ७.७२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| लघु दाब - VI विद्युत वाहने चार्जिंग (रु/kVAh)* | ८.०७ | ७.४३ | ७.५० | ७.७२ | ७.५६ |

**- अस्थिर वीज दरामध्ये ऊर्जा आकार आणि वहन आकार समाविष्ट आहेत*

त्याशिवाय, ही चार्जिंग स्टेशन्स, १० केडब्ल्युच्या पेक्षा जास्त भार असलेल्या ग्राहकांना लागू असलेल्या टाईम-ऑफ-डे वीज दरांव्यतिरिक्त, लोड फॅक्टरला देखील पात्र राहतील, ज्यामुळे त्यांचा वीज दर आणखी कमी होईल.

७. विद्यमान आदेशांची अंमलबजावणी पुढे चालू ठेवताना आणि सार्वजनिक वाहतूक आणि ठोक ग्राहकांना मदत करण्यासाठी, अति-उच्च दाब (११०/१३२ केव्ही) व्होल्टेज पातळीवर वीज पुरवठा घेणाऱ्या रेल्वे, मेट्रो, मोनोरेल आणि अन्य ग्राहकांना वहन आकार पुढेही लागू राहणार नाहीत.

८. आयोगाने उच्च दाब V (A) सार्वजनिक सेवा (शासकीय रुग्णालये आणि शैक्षणिक संस्था) आणि उच्च दाब V (B) सार्वजनिक सेवा - अन्य या दोहोंचे विलीनीकरण उच्च दाब - V - सार्वजनिक सेवा या एकाच वर्गवारीमध्ये केले आहे. त्याचप्रमाणे, लघु दाब V (A) सार्वजनिक सेवा (शासकीय रुग्णालये आणि शैक्षणिक संस्था) आणि लघु दाब V (B) सार्वजनिक सेवा - अन्य आणि लघु दाब V (C) सार्वजनिक दिवाबत्ती या वर्गवारींचे विलीनीकरण लघु दाब - V - सार्वजनिक सेवा या एकाच वर्गवारीमध्ये केले आहे.

९. आयोगाने ग्राहकांना ज्यादा दराने विजेसाठी आगाऊ भरणा करण्याची परवानगी दिली आहे आणि ज्या कालावधीसाठी आगाऊ भरणा करण्यात आला आहे त्या कालावधीसाठी ९.६०% ते १०.५०% व्याज उपार्जित होईल.

१०. **हरित ऊर्जा वीज दर:** आयोगाने नूतनशील ऊर्जा स्त्रोतांद्वारे विजेची गरज भागवणाऱ्या ग्राहकांना प्रति युनिट रु. ०.२५ हरित ऊर्जा वीज दर आकारणी सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. असा हरित ऊर्जा वीज दर या आदेशामध्ये मान्यता दिलेल्या वीज दराव्यतिरिक्त असेल. सर्व ग्राहक (अति उच्च-दाब व्होल्टेज, उच्च व्होल्टेज आणि लघु व्होल्टेज) हरित ऊर्जा वीज दराचा भरणा केल्यावर नूतनशील ऊर्जा घेण्यास पात्र राहतील. वितरण परवानाधारक ग्राहकांच्या सोयीसाठी त्याच्या वेब पोर्टल, मोबाईल ॲप किंवा अन्य कोणत्याही डिजिटल पध्दतीद्वारे हरित ऊर्जा वीज दरासाठी विनंती करण्याची सुविधा पुरविल. हरित वीज दर अदा करुन ग्राहकांनी घेतलेले पर्यावरणीय लाभ (हरित ॲट्रीब्युट्स) अशा ग्राहकाकडेच राहतील. वितरण परवानाधारक आरपीओ पूर्ततेसाठी अशा ऊर्जेची गणना करणार नाही.

११. सौर ऊर्जा तासांदरम्यान सवलत घेणाऱ्या बेस्टच्या ग्राहकांसाठी आयोगाने सुधारित टाईम ऑफ डे (टीओडी) वीज दर लागू केला आहे. एलटी १ -निवासी वर्गवारी अंतर्गत येणाऱ्या ग्राहकांसाठी,

स्मार्ट मीटर्स बसविण्याच्या अधीन राहून, रु. ०.५०/युनिट टीओडी सवलतीचा लाभ देखील लागू केला आहे. नवीन टीओडी टप्पे आणि संबंधित वीज दर आणि सवलत खाली नमूद केल्याप्रमाणे राहील:

| टीओडी टप्पा | | टीओडी टप्प्यांसाठी आयोगाची मान्यता | | |
|---|---|---|---|---|
| | वेळ | कालावधी (तास) | टीओडी आकार / वर्गवारींसाठी* (सवलत) * | एलटी- निवासी करिता टीओडी (सवलत) |
| - | ००:०० तास ते ०६:०० तास | ६ | -१०% - आ.व. २०२५-२६<br>-१५% - आ.व. २०२६-२७<br>-२०% - आ.व. २०२७-२८ ते आ.व. २०२९-३० | ०% |
| - | ०६:०० तास ते ०९:०० तास | ३ | ०% | ०% |
| सौर उर्जा तास | ०९:०० तास ते १७:०० तास | ८ | (एप्रिल ते सप्टेंबर)<br>-१५% - आ.व. २०२५-२६<br>-१५% - आ.व. २०२६-२७<br>-२०% - आ.व. २०२७-२८ ते आ.व. २०२९-३०<br><br>(ऑक्टोबर ते मार्च)<br>-२५% - आ.व. २०२५-२६<br>-२५% - आ.व. २०२६-२७<br>-३०% - आ.व. २०२७-२८ ते आ.व. २०२९-३० | सवलत:<br>आ.व. २०२५-२६ - ५० पैसे प्रति युनिट<br>आ.व. २०२६-२७ - ५५ पैसे प्रति युनिट<br>आ.व. २०२७-२८ - ६० पैसे प्रति युनिट<br>आ.व. २०२८-२९ - ६५ पैसे प्रति युनिट<br>आ.व. २०२९-३० - ७० पैसे प्रति युनिट |
| विजेच्या सर्वोच्च मागणीचे (पीक) तास | १७:०० तास ते २४:०० तास | ७ | +२०% | ०% |

१२. आयोगाने महावितरणमध्ये प्रचलित असल्याप्रमाणे मुंबईतील परवानाधारकांना देखील विजेच्या ठोक वापरावर सवलत सुरु केली आहे. महावितरणमध्ये प्रचलित असल्यानुसार, आयोगाने रिव्हर्स टेलिस्कोपिक स्लॅबसह मोठ्या प्रमाणावरील वापरावर सवलत लागू करण्याचा निर्णय घेतला असून उच्च-दाब औद्योगिक ग्राहकांतर्गत येणाऱ्या प्रति महिना १ लाख युनिट्स पेक्षा जास्त (प्रति महिना ०.१ एमयु ) वीज वापर असलेल्या अशा सर्व ग्राहकांना याचा फायदा होईल. अशा रीतीने, आयोगाने उच्च दाब - औद्योगिक ग्राहकांसाठी रिव्हर्स टेलिस्कोपिक पध्दतीने ठोक वीज वापरावर सवलत खालीलप्रमाणे सुरु केली आहे:

- मासिक वीज वापरासाठी (> १ लाख युनिट्स ते १ दशलक्ष) प्रति महिना: २%
- मासिक वीज वापरासाठी (> १ दशलक्ष ते ५ दशलक्ष) प्रति महिना: १.५%
- मासिक वीज वापरासाठी (> ५ दशलक्ष) प्रति महिना: १%

विजेच्या ठोक वापरावर असलेली सवलत देयकाच्या एफएसीसह ऊर्जा आकार घटकांवर, कर आणि शुल्क वगळून, लागू राहील.

१३. आयोगाने स्थिर/मागणी आकार संपूर्ण ५ व्या नियंत्रण कालावधी दरम्यान आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या विद्यमान पातळीवर ठेवले आहेत. त्याशिवाय, ग्राहकांच्या वीज दरात एकूणच घट होऊन त्यांना दिलासा मिळण्यासाठी प्रोत्साहन-अधिदान कायम ठेवण्यात/त्यामध्ये वाढ करण्यात आली आहे.

१४. आयोगाने २० केडब्ल्यु पेक्षा जास्त भार असलेल्या सर्व एलटी ग्राहकांसाठी १ एप्रिल, २०२५ पासून kVAh वीज दर आकारणी सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.

१५. आयोगाने केलेले काही अतिरिक्त बदल पुढीलप्रमाणे आहेत:

- डिस्ट्रीक्ट कुलिंग सोल्युशन (डीसीएस) औद्योगिक वर्गवारीमध्ये, म्हणजेच एचटी १ औद्योगिक आणि एलटी ३ औद्योगिक मध्ये, संचाच्या आकारमानावर अवलंबून लागू असल्यानुसार वर्गीकृत करण्यात येत आहे.
- सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प/सामायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, हे प्रकल्प निवासी संकुलासाठी वापरले जात असले किंवा नसले तरीही आणि ग्राहकांच्या मागणीनुसार त्यास स्वतंत्र जोडणी द्यावयाची असली किंवा नसली तरीही, सार्वजनिक सेवा वर्गवारी अंतर्गत वर्गीकृत करण्यात येत आहे.
- पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी, काही सुविधा/सेवा औद्यागिक वर्गवारी अंतर्गत वर्गीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे - हॉटेल्स/मॉटेल्स/युथ क्लब, रिसॉर्ट्स/कॉटेजेस्/सर्व्हिस अपाटमेंट, टुरिस्ट व्हिला/टुरिस्ट अपार्टमेंट एलटी आणि एचटी औद्योगिक अंतर्गत वर्गीकृत करण्यात येत आहे.
- रेल्वेगाडीच्या पुर्ननिर्मिती ब्रेकरद्वारे निर्माण केलेली ज्यादा वीज अन्य रेल्वेगाडीसाठी आणि सहाय्यकारी भारासाठी वापरल्यानंतर नेटिंग ऑफ करण्यास आणि ती वीज परवानाधारकाकडून घेतलेल्या विजेतून मासिक देयकामधून वजा करण्यास आयोगाने परवानगी दिली आहे.

१६. आयोगाने निरनिराळ्या ग्राहक वर्गवारी अंतर्गत असणारी क्रॉस-सबसिडीची पातळी, म्हणजे ग्राहकांची एक वर्गवारी दुसऱ्या वर्गवारीला किती मर्यादेपर्यंत क्रॉस-सबसिडी देईल किंवा घेईल, ही विद्युत अधिनियम, २००३ व राष्ट्रीय वीज धोरणाला अधीन राहून ठरविली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० करिता वर्गवारीनिहाय क्रॉस-सबसिडीची पातळी **परिशिष्ट ७** मध्ये देण्यात आली आहे.

१७. आयोगाने बेस्टच्या आकारांच्या अनुसूचीमध्ये सुधारणा केली आहे, जी मुंबईमध्ये कार्यरत असलेल्या अन्य वितरण परवानाधारकांच्या आकारांच्या अनुसूचींच्या सममूल्य आहे.

१८. आयोगाने क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय, भीम, इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग, मोबाईल वॉलेट इ. द्वारा मासिक विद्युत देयकांचा भरणा करणाऱ्या लघु-दाब वर्गवारीमधील ग्राहकांच्या मासिक विद्युत देयकांमध्ये, प्रति महिना रु. ५००/- च्या मर्यादेच्या अधीन राहून, ०.२५ टक्क्यांची सूट (कर आणि शुल्क वगळून) कायम ठेवली आहे.

१९. ग्राहकांनी प्रत्यक्ष देयकाच्या प्रती ऐवजी ई-देयकचा पर्याय स्वीकारल्यास, कागदाच्या वापरात बचत तसेच देयकाची छपाई आणि देयक वितरणाच्या खर्चात बचत करण्याच्या उद्देशाने, आयोगाने ग्राहकांना देयकामध्ये प्रति महा प्रति देयक रु. १०/- ची सवलत देण्यास मंजुरी दिली आहे.

२०. वर्गवारी-निहाय सरासरी देयक दर आणि वीज दरातील वाढ/(घट) **परिशिष्ट १** मध्ये दाखविण्यात आली आहे.

२१. आर्थिक वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० साठी विद्यमान आणि सुधारित वर्गवारी-निहाय वीज दराची तुलना खालील परिशिष्टांमध्ये देण्यात आली आहेः

अ. **परिशिष्ट २:** आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता विद्यमान आणि सुधारित वर्गवारी-निहाय वीज दर;

ब. **परिशिष्ट ३:** आर्थिक वर्ष २०२६-२७ करिता सुधारित वर्गवारी-निहाय वीज दर;

क. **परिशिष्ट ४:** आर्थिक वर्ष २०२७-२८ करिता सुधारित वर्गवारी-निहाय वीज दर;

ड. **परिशिष्ट ५:** आर्थिक वर्ष २०२८-२९ करिता सुधारित वर्गवारी-निहाय वीज दर;

इ. **परिशिष्ट ६:** आर्थिक वर्ष २०२९-३० करिता सुधारित वर्गवारी-निहाय वीज दर;

२२. क्रॉस-सबसिडीची वर्गवारी-निहाय पातळी **परिशिष्ट ७** मध्ये दाखविण्यात आली आहे.

२३. बेस्टने दावा केलेली एकूण महसुली गरज आणि आयोगाकडून मंजूर करण्यात आलेली रक्कम यातील ठळक तफावत **परिशिष्ट ८** मध्ये देण्यात आली आहे.

२४. सदर आदेश आयोगाच्या www.merc.gov.in. या संकेत-स्थळावर पाहता आणि उतरवून घेता येईल.

## Annexure 1: Average Billing Rate and Tariff Increase/Reduction

| Consumer Categories | Average Billing Rate (Rs/kWh) (Wheeling and Supply) | | | | | | Increase over Previous year (%) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | FY 2024-25 (Existing) | FY 2025-26 | FY 2026-27 | FY 2027-28 | FY 2028-29 | FY 2029-30 | FY 2025-26 | FY 2026-27 | FY 2027-28 | FY 2028-29 | FY 2029-30 |
| **HT Category** | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| HT - I Industry | 9.81 | 7.88 | 7.53 | 7.29 | 7.62 | 6.99 | -20% | -4% | -3% | 4% | -8% |
| HT - II Commercial | 10.73 | 7.86 | 7.59 | 7.50 | 7.70 | 7.03 | -27% | -3% | -1% | 3% | -9% |
| HT - III Group Housing | 8.68 | 7.12 | 6.70 | 6.52 | 6.78 | 6.12 | -18% | -6% | -3% | 4% | -10% |
| HT - IV Railways, Metro, Monorail | 11.36 | 8.89 | 8.52 | 8.40 | 8.40 | 7.54 | -22% | -4% | -1% | 0% | -10% |
| HT - V Public Services | 9.14 | 7.82 | 7.60 | 7.38 | 7.50 | 6.85 | -14% | -3% | -3% | 2% | -9% |
| HT - VI Electrical Vehicle Charging | 10.72 | 7.86 | 7.24 | 7.31 | 7.52 | 7.36 | -27% | -8% | 1% | 3% | -2% |
| **LT Category** | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| LT - I (B) Residential (0-100) | 4.19 | 4.13 | 4.12 | 4.24 | 4.22 | 3.65 | -1% | 0% | 3% | 0% | -14% |
| LT - I (B) Residential Total | 8.50 | 8.39 | 8.08 | 8.27 | 8.38 | 7.77 | -1% | -4% | 2% | 1% | -7% |
| LT - II (a) Commercial<20kW | 10.67 | 9.73 | 8.97 | 8.79 | 9.16 | 8.36 | -9% | -8% | -2% | 4% | -9% |
| LT - II (b) Commercial >20 kW & <=50 kW | 10.61 | 9.56 | 9.35 | 9.05 | 9.21 | 8.47 | -10% | -2% | -3% | 2% | -8% |
| LT - II (c) Commercial >50 kW | 9.61 | 8.81 | 9.01 | 8.71 | 8.92 | 8.22 | -8% | 2% | -3% | 2% | -8% |
| LT - III (A) Industry (upto 20 kW) | 9.18 | 8.51 | 7.94 | 7.81 | 8.08 | 7.37 | -7% | -7% | -2% | 3% | -9% |
| LT - III (B) Industrial (above 20 kW) | 10.41 | 9.69 | 9.15 | 8.86 | 9.00 | 8.27 | -7% | -6% | -3% | 2% | -8% |
| LT - IV Public Services | 9.23 | 8.29 | 7.68 | 7.39 | 7.64 | 7.00 | -10% | -7% | -4% | 3% | -8% |
| LT - VI Electrical Vehicle Charging | 7.74 | 7.99 | 7.35 | 7.42 | 7.63 | 7.47 | 3% | -8% | 1% | 3% | -2% |

**Annexure 2: Existing and Revised Category-wise Tariff for BEST's consumers for FY 2025-26 Category-wise**

| Consumer Category & Consumption Slab | Existing Tariff | | | Revised Applicable Tariff from 1 April, 2025 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Total Variable Charges (Rs./kVAh)* or (Rs/kWh) | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Energy Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Wheeling Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs./kVAh) or (Rs/kWh) |
| **HT Category** | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| HT - I Industry | | 400.00 | 8.27 | | 400.00 | 5.70 | 1.01 | 6.71 |
| HT - II Commercial | | 400.00 | 8.80 | | 300.00 | 5.85 | 1.01 | 6.86 |
| HT - III Group Housing | | 400.00 | 8.35 | | 400.00 | 5.10 | 1.01 | 6.11 |
| HT - IV Railways, Metro, Monorail | | 400.00 | 7.94 | | 200.00 | 5.18 | 1.01 | 6.19 |
| HT - V Public Services | | 400.00 | 8.19 | | 400.00 | 5.80 | 1.01 | 6.81 |
| HT - VI Electrical Vehicle Charging | | 80.00 | 8.00 | | 0.00 | 7.23 | 1.01 | 8.24 |
| **Sub Total** | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| **LT Category** | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| LT - I (A) Residential (BPL) | 12.00 | | 3.49 | 12.00 | | 1.52 | 2.10 | 3.62 |
| **LT - I (B) Residential** | | | | | | | | |
| 0-100 units | 90.00 | | 3.84 | 90.00 | | 1.74 | 2.10 | 3.84 |
| 101-300 units | 135.00 | | 7.43 | 135.00 | | 5.33 | 2.10 | 7.43 |
| 301-500 units | 135.00 | | 11.53 | 135.00 | | 9.81 | 2.10 | 11.91 |
| >501 units | 160.00 | | 13.70 | 160.00 | | 12.01 | 2.10 | 14.11 |

| Consumer Category & Consumption Slab | Existing Tariff | | | Revised Applicable Tariff from 1 April, 2025 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Total Variable Charges (Rs./kVAh)* or (Rs/kWh) | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Energy Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Wheeling Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs./kVAh) or (Rs/kWh) |
| LT - II (a) Commercial<20kW | 475.00 | | 9.05 | 475.00 | | 6.55 | 2.10 | 8.64 |
| LT - II (b) Commercial >20 kW & <=50 kW | | 400.00 | 7.85 | | 300.00 | 6.05 | 2.10 | 8.15 |
| LT - II (c) Commercial >50 kW | | 400.00 | 7.22 | | 300.00 | 5.55 | 2.10 | 7.65 |
| LT - III (A) Industry (upto 20 kW) | 475.00 | | 8.70 | 475.00 | | 6.30 | 2.10 | 8.40 |
| LT - III (B) Industrial (above 20 kW) | | 400.00 | 8.63 | | 400.00 | 6.34 | 2.10 | 8.44 |
| LT - IV Public Services | 475.00 | | 9.12 | 475.00 | | 6.44 | 2.10 | 8.54 |
| LT - V (A) Agriculture-Pumpsets | 45.00 | | 4.49 | 45.00 | | 2.52 | 2.10 | 4.62 |
| LT - V (B) Agriculture-Others | 100.00 | | 6.90 | 100.00 | | 4.93 | 2.10 | 7.03 |
| LT - VI Electrical Vehicle Charging | 80.00 | | 7.75 | 0.00 | | 6.31 | 2.10 | 8.41 |

**LT Tariff is outlined as per Rs./kWh for comparison purpose.*

*$: Public Service Tariff comparison is with Government Owned category existed in FY 2024-25.*

## Annexure 3: Category-wise Tariff for BEST's consumers for FY 2026-27

| Consumer Category & Consumption Slab | Revised Applicable Tariff from 1 April, 2026 | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Energy Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Wheeling Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs./kVAh) or (Rs/kWh) |
| **HT Category** | | | | | |
| | | | | | |
| HT - I Industry | | 400.00 | 5.47 | 0.88 | 6.35 |
| HT - II Commercial | | 300.00 | 5.68 | 0.88 | 6.56 |
| HT - III Group Housing | | 400.00 | 4.72 | 0.88 | 5.60 |
| HT - IV Railways, Metro, Monorail | | 200.00 | 4.86 | 0.88 | 5.74 |
| HT - V Public Services | | 400.00 | 5.53 | 0.88 | 6.41 |
| HT - VI Electrical Vehicle Charging | | 0.00 | 6.80 | 0.88 | 7.68 |
| **Sub Total** | | | | | |
| | | | | | |
| **LT Category** | | | | | |
| | | | | | |
| LT - I (A) Residential (BPL) | 12.00 | | 1.52 | 1.82 | 3.34 |
| **LT - I (B) Residential** | | | | | |
| 0-100 units | 90.00 | | 2.02 | 1.82 | 3.84 |
| 101-300 units | 135.00 | | 5.35 | 1.82 | 7.17 |
| 301-500 units | 135.00 | | 10.04 | 1.82 | 11.85 |
| >501 units | 160.00 | | 11.25 | 1.82 | 13.07 |
| LT - II (a) Commercial<20kW | 475.00 | | 6.17 | 1.82 | 7.99 |
| LT - II (b) Commercial >20 kW & <=50 kW | | 300.00 | 5.94 | 1.74 | 7.68 |
| LT - II (c) Commercial >50 kW | | 300.00 | 5.91 | 1.74 | 7.65 |
| LT - III (A) Industry (upto 20 kW) | 475.00 | | 6.02 | 1.82 | 7.84 |
| LT - III (B) Industrial (above 20 kW) | | 400.00 | 5.87 | 1.74 | 7.61 |
| LT - IV Public Services | 475.00 | | 5.87 | 1.74 | 7.62 |
| LT - V (A) Agriculture-Pumpsets | 45.00 | | 2.52 | 1.82 | 4.34 |
| LT - V (B) Agriculture-Others | 100.00 | | 4.93 | 1.82 | 6.75 |
| LT - VI Electrical Vehicle Charging | 0.00 | | 5.69 | 1.74 | 7.43 |

**-kWh tariff for LT Residential and LT Consumer below 20 kW and kVAh tariff for HT and LT consumer above 20 kW*

## Annexure 4: Category-wise Tariff for BEST's consumers for FY 2027-28

| Consumer Category & Consumption Slab | Revised Applicable Tariff from 1 April, 2027 | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Energy Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Wheeling Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs./kVAh) or (Rs/kWh) |
| **HT Category** | | | | | |
| | | | | | |
| HT - I Industry | | 400.00 | 5.19 | 0.90 | 6.09 |
| HT - II Commercial | | 300.00 | 5.54 | 0.90 | 6.44 |
| HT - III Group Housing | | 400.00 | 4.56 | 0.90 | 5.46 |
| HT - IV Railways, Metro, Monorail | | 200.00 | 4.73 | 0.90 | 5.63 |
| HT - V Public Services | | 400.00 | 5.24 | 0.90 | 6.14 |
| HT - VI Electrical Vehicle Charging | | 0.00 | 6.84 | 0.90 | 7.75 |
| **Sub Total** | | | | | |
| | | | | | |
| **LT Category** | | | | | |
| | | | | | |
| LT - I (A) Residential (BPL) | 12.00 | | 1.52 | 1.87 | 3.39 |
| **LT - I (B) Residential** | | | | | |
| 0-100 units | 90.00 | | 2.10 | 1.87 | 3.97 |
| 101-300 units | 135.00 | | 5.50 | 1.87 | 7.37 |
| 301-500 units | 135.00 | | 10.18 | 1.87 | 12.05 |
| >501 units | 160.00 | | 11.55 | 1.87 | 13.42 |
| LT - II (a) Commercial<20kW | 475.00 | | 6.04 | 1.87 | 7.91 |
| LT - II (b) Commercial >20 kW & <=50 kW | | 300.00 | 5.63 | 1.80 | 7.43 |
| LT - II (c) Commercial >50 kW | | 300.00 | 5.63 | 1.80 | 7.42 |
| LT - III (A) Industry (upto 20 kW) | 475.00 | | 5.84 | 1.87 | 7.71 |
| LT - III (B) Industrial (above 20 kW) | | 400.00 | 5.51 | 1.80 | 7.31 |
| LT - IV Public Services | 475.00 | | 5.53 | 1.80 | 7.32 |
| LT - V (A) Agriculture-Pumpsets | 45.00 | | 2.52 | 1.87 | 4.39 |
| LT - V (B) Agriculture-Others | 100.00 | | 4.93 | 1.87 | 6.80 |
| LT - VI Electrical Vehicle Charging | 0.00 | | 5.70 | 1.80 | 7.50 |

**-kWh tariff for LT Residential and LT Consumer below 20 kW and kVAh tariff for HT and LT consumer above 20 kW*

## Annexure 5: Category-wise Tariff for BEST's consumers for FY 2028-29

| Consumer Category & Consumption Slab | Revised Applicable Tariff from 1 April, 2028 | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Energy Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Wheeling Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs./kVAh) or (Rs/kWh) |
| **HT Category** | | | | | |
| | | | | | |
| HT - I Industry | | 400.00 | 5.53 | 0.91 | 6.44 |
| HT - II Commercial | | 300.00 | 5.74 | 0.91 | 6.65 |
| HT - III Group Housing | | 400.00 | 4.86 | 0.91 | 5.77 |
| HT - IV Railways, Metro, Monorail | | 200.00 | 4.73 | 0.91 | 5.64 |
| HT - V Public Services | | 400.00 | 5.34 | 0.91 | 6.25 |
| HT - VI Electrical Vehicle Charging | | 0.00 | 7.06 | 0.91 | 7.97 |
| **Sub Total** | | | | | |
| | | | | | |
| **LT Category** | | | | | |
| | | | | | |
| LT - I (A) Residential (BPL) | 12.00 | | 1.52 | 1.87 | 3.39 |
| **LT - I (B) Residential** | | | | | |
| 0-100 units | 90.00 | | 2.09 | 1.87 | 3.96 |
| 101-300 units | 135.00 | | 5.62 | 1.87 | 7.49 |
| 301-500 units | 135.00 | | 10.48 | 1.87 | 12.35 |
| >501 units | 160.00 | | 11.85 | 1.87 | 13.73 |
| LT - II (a) Commercial<20kW | 475.00 | | 6.54 | 1.87 | 8.41 |
| LT - II (b) Commercial >20 kW & <=50 kW | | 300.00 | 5.85 | 1.80 | 7.64 |
| LT - II (c) Commercial >50 kW | | 300.00 | 5.91 | 1.80 | 7.71 |
| LT - III (A) Industry (upto 20 kW) | 475.00 | | 6.14 | 1.87 | 8.01 |
| LT - III (B) Industrial (above 20 kW) | | 400.00 | 5.66 | 1.80 | 7.46 |
| LT - IV Public Services | 475.00 | | 5.80 | 1.80 | 7.60 |
| LT - V (A) Agriculture-Pumpsets | 45.00 | | 2.52 | 1.87 | 4.39 |
| LT - V (B) Agriculture-Others | 100.00 | | 4.93 | 1.87 | 6.80 |
| LT - VI Electrical Vehicle Charging | 0.00 | | 5.92 | 1.80 | 7.72 |

**-kWh tariff for LT Residential and LT Consumer below 20 kW and kVAh tariff for HT and LT consumer above 20 kW*

## Annexure 6: Category-wise Tariff for BEST's consumers for FY 2029-30

| Consumer Category & Consumption Slab | Revised Applicable Tariff from 1 April, 2029 | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Fixed Charge (Rs / Consumer /month) | Demand Charge (Rs/KVA/ month) | Energy Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Wheeling Charge (Rs./kVAh) or (Rs/kWh) | Total Variable Charges (Rs./kVAh) or (Rs/kWh) |
| **HT Category** | | | | | |
| | | | | | |
| HT - I Industry | | 400.00 | 4.88 | 0.90 | 5.78 |
| HT - II Commercial | | 300.00 | 5.04 | 0.90 | 5.94 |
| HT - III Group Housing | | 400.00 | 4.26 | 0.90 | 5.16 |
| HT - IV Railways, Metro, Monorail | | 200.00 | 4.01 | 0.90 | 4.91 |
| HT - V Public Services | | 400.00 | 4.64 | 0.90 | 5.54 |
| HT - VI Electrical Vehicle Charging | | 0.00 | 6.91 | 0.90 | 7.80 |
| **Sub Total** | | | | | |
| | | | | | |
| **LT Category** | | | | | |
| | | | | | |
| LT - I (A) Residential (BPL) | 12.00 | | 1.52 | 1.85 | 3.37 |
| **LT - I (B) Residential** | | | | | |
| 0-100 units | 90.00 | | 1.55 | 1.85 | 3.40 |
| 101-300 units | 135.00 | | 5.19 | 1.85 | 7.04 |
| 301-500 units | 135.00 | | 9.68 | 1.85 | 11.53 |
| >501 units | 160.00 | | 11.05 | 1.85 | 12.90 |
| LT - II (a) Commercial<20kW | 475.00 | | 5.81 | 1.85 | 7.66 |
| LT - II (b) Commercial >20 kW & <=50 kW | | 300.00 | 5.16 | 1.78 | 6.94 |
| LT - II (c) Commercial >50 kW | | 300.00 | 5.29 | 1.78 | 7.07 |
| LT - III (A) Industry (upto 20 kW) | 475.00 | | 5.44 | 1.85 | 7.29 |
| LT - III (B) Industrial (above 20 kW) | | 400.00 | 4.93 | 1.78 | 6.71 |
| LT - IV Public Services | 475.00 | | 5.17 | 1.78 | 6.95 |
| LT - V (A) Agriculture-Pumpsets | 45.00 | | 2.52 | 1.85 | 4.37 |
| LT - V (B) Agriculture-Others | 100.00 | | 4.63 | 1.85 | 6.48 |
| LT - VI Electrical Vehicle Charging | 0.00 | | 5.78 | 1.78 | 7.56 |

**-kWh tariff for LT Residential and LT Consumer below 20 kW and kVAh tariff for HT and LT consumer above 20 kW*

## Annexure 7: Category-wise movement of Cross Subsidy Levels

| Category | FY 2025-26 | FY 2026-27 | FY 2027-28 | FY 2028-29 | FY 2029-30 |
|---|---|---|---|---|---|
| **HT Category** | | | | | |
| HT - I Industry | 102% | 101% | 98% | 100% | 100% |
| HT - II Commercial | 102% | 101% | 101% | 101% | 101% |
| HT - III Group Housing | 91% | 88% | 86% | 87% | 86% |
| HT - IV Railways, Metro, Monorail | 117% | 114% | 113% | 109% | 107% |
| HT - V Public Services | 102% | 102% | 99% | 98% | 98% |
| HT - VI Electrical Vehicle Charging | 103% | 97% | 99% | 99% | 108% |
| | | | | | |
| **LT Category** | | | | | |
| LT - I (B) Residential | 94% | 95% | 98% | 97% | 97% |
| LT - II (a) Commercial<20kW | 114% | 108% | 106% | 108% | 107% |
| LT - II (b) Commercial >20 kW & <=50 kW | 111% | 114% | 110% | 109% | 109% |
| LT - II (c) Commercial >50 kW | 100% | 109% | 105% | 105% | 105% |
| LT - III (A) Industry (upto 20 kW) | 96% | 93% | 91% | 92% | 91% |
| LT - III (B) Industrial (above 20 kW) | 113% | 111% | 107% | 106% | 106% |
| LT - IV Public Services | 92% | 89% | 85% | 86% | 85% |
| LT - VI Electrical Vehicle Charging | 88% | 84% | 85% | 86% | 93% |

**Annexure 8: Key variations between the ARR claimed by BEST and amounts approved by the Commission.**

| Sr. No. | Particulars | ARR Claimed over the 8-year period from FY 2022-23 to FY 2029-30 | | |
|---|---|---|---|---|
| | | BEST | Commission | Difference |
| | | A | B | C = B - A |
| 1 | Total ARR | **37502.85** | **37868.28** | **365.43** |
| | **Major Heads** | | | |
| 2 | Power Purchase | 23580.97 | 24756.81 | 1175.83 |
| 3 | O&M Expenses | 7818.82 | 7756.18 | -62.64 |
| 4 | Depreciation | 1204.43 | 1084.49 | -119.95 |
| 5 | Interest on Loan | 8.98 | 9.68 | 0.69 |
| 6 | Intra-State Transmission Charges / MSLDC | 2948.21 | 2417.33 | -530.88 |
| 7 | Return on Equity | 1461.20 | 1419.92 | -41.29 |
| 8 | Interest on Consumer Security Deposit | 269.10 | 321.23 | 14.24 |
| 9 | Others | 596.78 | 488.32 | -137.66 |
| 10 | Non-Tariff Income | 385.66 | 385.66 | 39.73 |